| | | |
|---|---|---|
| | | **१०००/- ऐवजी दरमहा रु. २०००/- प्रमाणे तरतूद करण्यात यावी व प्रत्येक पंचायत समितीस कपाट खरेदीसाठी रु. ८०००/- एवढी रक्कम देण्यात यावी, प्रस्तावित बाबीवरील खर्च मंडळाकडील उपकर निधीमधून भागविण्यात यावा. याप्रमाणे आवश्यक तो बदल करून प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| **७.** | **मंडळाकडील जमा उपकर निधीमधून कार्यरत कल्याणकारी योजना व प्रस्तावित योजनांवरील खर्चाच्या आराखड्यास (Comprehensive Plan) मंजूरी देणेबाबत.** | याबाबत मंडळ सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या असे निदर्शनास आणून दिले की, मा. सर्वोच्च न्यायालयात नॅशनल कॅम्पेन कमिटी फॉर सेंट्रल लेजिसलेशन ऑन कन्स्ट्रक्शन लेबर यांनी इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम ,१९९६ व इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम ,१९९६ च्या तरतूदीची अंमलबजावणी करण्यासंदर्भात दाखल केलेल्या रिट याचिका क्र.३१८/२००६ च्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालय राज्यनिहाय जमा उपकर, कल्याणकारी योजनांवरील खर्च व बांधकाम कामगारांची नोंदणी यावर लक्ष ठेवून आहे. इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे कामकाज समाधानकारक नसल्याचे मत नोंदवून बांधकाम कामगारांची कमी नोंदणी व कल्याणकारी योजनांवरील कमी खर्च याबाबत कायद्यातील तरतूदीनुसार त्वरेने पाऊले उचलण्याचे दि.१५.०३.२०११, दि.२५.०४.२०११ व दि.१६.१०.२०१५ रोजीच्या आदेशान्वये मा. सर्वोच्च न्यायालयाने केंद्र शासनामार्फत निर्देश दिले आहेत. |

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील बांधकाम कामगारांची नोंदणी तसेच त्यांच्या कल्याणकारी योजनांवरील खर्च याबाबत संसदेच्या स्थायी समिती (कामगार) यांचे मार्फत कामगार आयुक्त, महाराष्ट्र शासन यांची दि.२३.०५.२०१७ रोजी साक्ष घेण्यात आली होती. सदर साक्षी दरम्यान उक्त समितीने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत असलेली कमी कामगार नोंदणी व त्यांच्या कल्याणकारी योजनेवरील कमी उपकर खर्चाबाबत तीव्र नाराजी व्यक्त करून कामगारांची नोंदणी वाढविणे व जास्तीत जास्त जमा उपकर निधी बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी खर्च करण्याचे निर्देश दिले आहेत. सदर समितीने दिलेल्या निर्देशास अनुसरून दि.२४.०५.२०१७ रोजी राज्य शासनास अहवाल सादर करण्यात आला आहे.<br><br>राज्य स्तरावरील बांधकाम मंडळांना केंद्र शासनाने दिलेल्या निदेशाचा आढावा घेण्यासाठी केंद्र शासन स्तरावर संनियत्रण समिती स्थापन करण्यात आली असून त्याद्वारे मंडळाच्या कामकाजाचा तसेच केंद्र शासनाने मंडळास दिलेल्या निदेशांचा नियमितपणे आढावा घेण्यात येतो. वेळोवेळी झालेल्या बैठकीमध्ये इतर अनेक राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यातील कमी कामगार नोंदणी व कल्याणकारी योजनांवर झालेल्या कमी खर्चाबाबत सदरील बैठकीमध्ये सुधारणा करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.<br><br>अखर्चित उपकर निधीबाबत महाराष्ट्र राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सन्मानिय सदस्य श्री. सुरेश |



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

हळवणकर व इतर विधानसभा सदस्य यांनी विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवर मा. मुख्यमंत्री महोदय यांनी "याकरिता तात्काळ कामगार विभाग व आयुक्तांना सांगून या पुढील ०२ महिन्यामध्ये कॉम्प्रेहेंसीव्ह प्लॅन व पॉलिसी तयार करण्याचे आदेश देण्यात येतील." असे आश्वासन सभागृहास दिलेले आहे.

त्या अनुषंगाने मंडळातील कार्यरत कल्याणकारी योजना व प्रस्तावित योजनांचा आराखडा तयार करण्यात आलेला असून मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दि.२८.०६.२०१७ रोजी झालेल्या कामगार विभागाच्या आढावा बैठकीत रू. २२४८ कोटी रक्कमेचा आराखडा सादर करण्यात आला होता. सदर आराखडयातील अनु. क्र.०३ म्हाडा कडील अल्प उत्पन्न गटातील तयार घरे खरेदी करून मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना भाडेतत्वावर उपलब्ध करून देणेबाबतच्या योजनेस प्रस्तावित खर्च रू. १५० कोटी वगळून रू.२०९८ कोटीच्या आराखडयास सहमती दर्शवून मंडळाची मान्यता घेऊन आराखडा शासनास सादर करणेबाबत निर्देश देण्यात आले. त्यानुसार कल्याणकारी योजनांवरील रू.२०९८ कोटी खर्चाचा आराखडा मंडळाच्या मान्यतेस सादर करण्यात येत असल्याचे मंडळ सचिवांनी नमुद केले.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: मंडळाकडील जमा उपकर निधीमधून कार्यरत कल्याणकारी योजना व प्रस्तावित योजनांवरील**



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | खर्चाच्या आराखड्यास (Comprehensive Plan) मंजूरी देणेबाबत मंडळाच्या अखर्चित उपकर निधीबाबत महाराष्ट्र राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सन्मानिय सदस्य श्री. सुरेश हळवणकर व इतर विधानसभा सदस्य यांनी विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवर मा. मुख्यमंत्री महोदय यांनी "याकरिता तात्काळ कामगार विभाग व आयुक्तांना सांगून या पुढील ०२ महिन्यामध्ये कॉम्प्रेहेंसीव्ह प्लॅन व पॉलिसी तयार करण्याचे आदेश देण्यात येतील," असे आश्वासन सभागृहास दिले होते. त्यास अनुसरुन मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली संपन्न दिनांक २८.०६.२०१७ रोजी झालेल्या कामगार विभागाच्या आढावा बैठकीत रू. २२४८ कोटी रक्कमेचा आराखडा सादर करण्यात आला होता. सदर आराखडयातील अनु. क्र.०३ म्हाडा कडील अल्प उत्पन्न गटातील तयार घरे खरेदी करून मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना भाडेतत्वावर घरे उपलब्ध करून देणेबाबतच्या योजनेस प्रस्तावित खर्च रू. १५० कोटी वगळून रू.२०९८ कोटीच्या आराखडयास मा. मुख्यमंत्री महोदयांनी सहमती दर्शविली. सदर आराखडयास मंडळाची मान्यता प्रदान करणेबाबतचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला. |
| ८. | मनरेगा योजनेअंतर्गत कार्यरत बांधकाम | याबाबत बोलताना मंडळ सचिव यांनी असे प्रतिपादन केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्तीचे नियमन) अधिनियम, १९९६ च्या तरतुदीप्रमाणे दिनांक ०१.०५.२०११ रोजी महाराष्ट्र |



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| | **कामगारांपैकी ५० दिवस प्रमाणपत्राच्या आधारे नोंदणीकृत बांधकाम कामगारांना मंडळाच्या विविध योजनांचा लाभ देणेबाबत.** | इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना केलेली आहे. इमारत व इतर बांधकाम कामगारांच्या कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्याबाबतचे काम मंडळाकडुन करण्यात येत आहे.<br>राष्ट्रिय ग्रामिण रोजगार हमी योजनेतील कामगार हे बहुतांशी ग्रामिण भागातील असल्यामुळे त्यांची नोंदणी व कामाचे नियंत्रण हे जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा पीरषद यांच्यामार्फत होत असल्यामुळे दि. २५.०२.२०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर कामगारांना इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात नोंदणी करून त्यांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी जिल्हास्तरावर मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समन्वय समिती गठित करण्यात आली आहे.<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामध्ये मनरेगा योजनेंतर्गत मागील १२ महिन्यात "**बांधकाम क्षेत्रात**" कमीत कमी ५० दिवस काम करणाऱ्या कामगारांची नोंदणी करून घेण्याबाबत दि. १२.०७.२०१३ रोजीचे केंद्र शासनाचे पत्र मंडळास प्राप्त झाले होते.<br>केंद्र शासनाच्या उक्त पत्रान्वये मंडळाच्या दि. ०३.०९.२०१६ रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामध्ये मनरेगा योजनेंतर्गत बांधकाम क्षेत्रात मागील १२ महिन्यात कमीत कमी ५० दिवस काम करणाऱ्या कामगारांची नोंदणी करून घेण्याबाबतचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला होता. मंडळाच्या सदर ठरावानूसार कार्यवाही करण्याबाबत सर्व विभागीय/ जिल्हा कार्यालयांना कळविण्यात |

| | | |
|---|---|---|
| | | आले होते.<br>तथापि. शासनाच्या दि.२०.०३.२०१७ रोजीच्या पत्रासोबत श्री. ए. के. सिंग, अवर सचिव, श्रम व रोजगार मंत्रालय. भारत सरकार, नवी दिल्ली यांचे दि.१०.०२.२०१७ रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे.<br>सदर पत्रान्वये केंद्र शासनाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मागील १२ महिन्यात ५० दिवस काम पूर्ण करणाऱ्या कामगारांची नोंदणी मंडळांतर्गत लाभार्थी म्हणून करण्याकरीता दिलेल्या निदेशांबाबत फेरविचार करून सदरचे निर्देश मागे घेतले असून सदर कामगारांच्या नोंदणीबाबत इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम १२ (१) प्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.(९० दिवस बांधकाम कामगार म्हणुन केल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळविण्याबाबत.)<br>केंद्र शासनास दिनांक २८.०४.२०१७ रोजीच्या पत्रान्वये दिनांक १२.०७.२०१३ च्या केंद्र शासनाच्या निर्देशानुसार ५० दिवस काम केलेल्या साधरणत: ५ हजार कामगारांची नोंदणी ग्राहय धरावी की रद्द करावी याबाबत केंद्र शासनाचे मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे.अद्याप या विषयी केंद्र शासकनाकडून कुठल्याही प्रकारचे मार्गदर्शन मंडळास प्राप्त झालेले नाही.<br>सहाय्यक कामगार आयुक्त, गोंदीया व भंडारा या कार्यालयात ५० दिवस पूर्ण केलेल्या नोंदीत कामगारांनी विविध योजनेअंतर्गत अर्ज सादर केलेले असून ते प्रलंबित असल्याचे त्यांच्या पत्रात नमूद आहेत. उक्त नोंदीत |



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | कामगारांच्या सदरहू अर्जावर पुढील कार्यवाही करून निकाली काढण्यात यावे किंवा कसे याबाबत मंडळाकडून मार्गदर्शन मागविले आहे.<br><br>मनरेगा योजनेंतर्गत ५० दिवस काम केलेल्या बांधकाम कामगारांना मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देणेबाबत व नोंदणीनंतर ०१ वर्षे पूर्ण झाल्यावर ९० दिवसाचे प्रमाणापत्र प्राप्त करून नोंदणीचे नुतनीकरण करणेबाबत मंडळाच्या निर्णयार्थ प्रस्ताव सादर करण्यात येत आहे, असे मंडळ सचिव यांनी सांगितले.<br><br>याबाबत मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी असे सांगितले की, मनरेगाअंतर्गत नोंदणी केलेल्या कामगारांची नोंदणी रद्द करू नये, असा ठराव मंडळाने आपल्या स्तरावर घ्यावा. त्यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली.<br><br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br><br>**ठराव: मनरेगा योजनेअंतर्गत कार्यरत बांधकाम कामगारांपैकी ५० दिवस प्रमाणपत्राच्या आधारे नोंदणीकृत बांधकाम कामगारांना मंडळाच्या विविध योजनांचा लाभ देणेबाबत केंद्र शासनाचे सुधारित निर्देश प्राप्त होण्याच्या अधिन राहून सदर कालावधीत १२ महिन्यात कमीत कमी ५० दिवस काम करणाऱ्या ज्या कामगारांची नोदणी झालेली आहे त्या कामगारांना मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यात यावा व नोंदणीच्या तारखेपासून १ वर्ष पुर्ण झाल्यानंतर अधिनियमाच्या** |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | **कलम १२(१) प्रमाणे ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करून पुर्ननोंदणी करण्यात यावी व तसे सर्व जिल्हा व विभागीय कार्यालयांना कळविण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| ९. | **मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांना कौशल्य वृद्धीकरण (RPL) योजनेअंतर्गत प्रशिक्षणाचे असेसमेंट (Assessment) करीता केंद्रशासनाच्या एम्पॅनल संस्थेऐवजी राज्य शासनाने नियुक्त केलेल्या संस्थेमार्फत असेसमेंट** | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दि.०३.०९.२०१६ च्या बैठकीमध्ये व मा.मंत्री (कामगार) यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये कौशल्य वृध्दीकरण योजनेबाबत सविस्तर चर्चा होऊन Recognition of Prior Learning (RPL) for Construction workers या केंद्र शासनाच्या योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्यातील नोंदीत बांधकाम कामगारांसाठी करण्याबाबत मंडळाची मंजुरी घेण्यात आली होती. त्या अनुषंगाने दि.२७.०९.२०१६ रोजी च्या पत्रान्वये शासन मंजुरीस प्रस्ताव सादर करण्यात आला होता.<br>उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने पत्र दि. २७.०२.२०१७ अन्वये सदर योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार केंद्र शासनाने एमपॅनल केलेल्या खाली नमूद प्रशिक्षण संस्थांना तसेच प्रशिक्षणाची नियतकालीक तपासणी करण्यासाठी केंद्र शासनाने एमपॅनल केलेल्या तपासणी संस्थापैकी (ट्रेनिंग प्रोव्हायडर्स व असेसिंग बॉडीज) खालील संस्थांना महसुल विभाग निहाय खालीलप्रमाणे नियुक्ती करण्यात आले आहे. |

| **अ.क्र.** | **विभागाचे नांव** | **ट्रेनिंग प्रोव्हायडर्स** | **असेसींग बॉडीज** |
|---|---|---|---|



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | (Assessment) **करणेबाबत.** | (see below) |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | कोकण विभाग | लेबरनेट सर्विसेस इंडिया प्रा.लि., बंगलोर | इंडिया स्किल्स न्यु दिल्ली. |
| २. | पुणे विभाग | आय एल अॅन्ड एफ एस स्किल्स, नोएडा | इंडिया स्किल्स, न्यु दिल्ली |
| ३. | नाशिक विभाग | जी अॅन्ड जी स्किल्स डेव्हलपर्स प्रा.लि., पंचकुला | एकजो, चंदीगड |
| ४. | नागपूर विभाग | सुशिल बहुउद्देशीय शिक्षण संस्था, नागपूर | शिक्षा भारती न्यु दिल्ली |
| ५. | औरंगाबाद विभाग | भास्कर फाऊंडेशन, दिल्ली | वर्च्युअल एज्युकेशन ट्रस्ट |

सदर प्रशिक्षण संस्थासोबत दि.१६.०३.२०१७ रोजी MOU करण्यात आलेला आहे. त्यानुसार प्रशिक्षण संस्थांनी प्रशिक्षणार्थीची निवड करणे, आरडीएटी च्या वेबसाईटवर अपलोड करणे, असेसमेंन्ट झालेल्या लाभार्थ्यांना प्रशिक्षण देणेबाबतची कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे. सद्यास्थितीत ११९७ प्रशिक्षणार्थीची निवड झाली असून २८३ प्रशिक्षणार्थीच असेसमेंन्टससाठी निवड करून ४९ प्रशिक्षणार्थीचे असेसमेंन्ट पूर्ण झाले आहे व प्रशिक्षणाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

प्रादेशिक संचालक, कौशल्य विकास एवं उद्यमिता मंत्रालय, सायन, मुंबई यांचे दि.१५.०५.२०१७ च्या पत्रान्वये उपरोक्त निवड केलेल्या विभागनिहाय असेसिंग बॉडी ऐवजी आरडीएटी कडून ०५ बॅचेस करीता ०१ असेसिंग बॉडी अशा चक्राकार पध्दतीने असेसिंग बॉडीची नियुक्ती करण्यात येईल असे सूचित केले आहे.



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | सबब, मंडळाने व राज्य शासनाने नेमणूक केलेल्या असेसिंग बॉडीच्या विभागनिहाय वाटपामध्ये फेर बदल करावे लागणार आहेत, असे मंडळ सचिव म्हणाले.<br>यावर मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी असे सांगितले की, केंद्र शासनाने एमपॅनल केलेल्या प्रशिक्षण संस्थेबरोबर राज्य शासनाने SCVT मार्फत एमपॅनल केलेल्या संस्थांचाही समावेश करण्यात यावा. सदर संस्थांचे कार्यालय महाराष्ट्रात असणे आवश्यक आहे व राज्य शासनाच्या पॅनलवरील असेसिंग बॉडीज नियुक्त करण्याबाबतचा सुधारित प्रस्ताव शासन मान्यतेस्तव पाठविण्यात यावा.<br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांना कौशल्य वृद्धीकरण (RPL) योजनेअंतर्गत प्रशिक्षणाचे असेसमेंट (Assessment) करीता केंद्रशासनाच्या एम्पॅनल संस्था व राज्य शासनाच्या कौशल्य विभागाने SCVT मार्फत नियुक्त केलेल्या संस्थेमार्फत असेसमेंट (Assessment) करणेबाबत चा सुधारित प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| **१०.** | **मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी** | याबाबत मंडळ सचिव असे म्हणाले की, मंडळाच्या दि.२८.०२.२०१७ रोजीच्या बैठकीत मंडळांतर्गत कामकाजाचे एकात्मिक संगणकीय प्रणाली बाह्ययंत्रणेमार्फत तयार करुन घेणेबाबत तयार करण्यात आलेले |



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | **योजनांचे RFP Document बनविण्यासाठी व Bid Management करण्यासाठी मंडळावर नियुक्त केलेल्या मे. KPMG या IT Consultant ना मुदतवाढ देणे बाबत.** | RFP Document व ई-निविदा रद्द करण्यात यावी. मंडळामार्फत नियुक्त करण्यात आलेले IT Consultant मे. अर्न्स्ट ॲन्ड यंग एल पी पी यांची नियुक्ती रद्द करण्यात यावी. त्याऐवजी KPMG या IT Consultant ची नियुक्ती करण्यात यावी व त्यांचेकडून सदर कामाचे नव्याने RFP Document तयार करून घेण्यात यावे. नव्याने तयार करण्यात आलेल्या RFP Document मंडळाचे बैठकीसमोर ठेवून त्यावर चर्चा करून त्यास मंडळाची मान्यता घेवून पुन्हा मंडळ स्तरावर ई-निविदा प्रसिद्ध करण्यात यावी, असा ठराव घेण्यात आला होता.<br>माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या दि.०१.०७.२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये व मंडळाच्या दि.२८.०२.२०१७ रोजीच्या मंडळाच्या बैठकीत झालेल्या ठरावानुसार मे. केपीएमजी या आयटी कन्सल्टंट कडून १ सिनियर कन्सल्टंट व १ कन्सल्टंट यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.<br>मा.प्रधान सचिव कामगार विभाग, मा. कामगार आयुक्त व मा. विकास आयुक्त, असंघटीत कामगार यांची संयुक्त बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत प्रारूप RFP Document मध्ये खालील बदल करावयाचे ठरले व त्यानुसार एकात्मिक संगणकीय प्रणाली व मंडळाच्या जिल्हास्तरीय सुविधाकेंद्रांची स्थापना करणे याकरीता स्वतंत्र RFP डॉक्युमेंटस तयार करणेबाबत निर्णय घेण्यात आला.<br>मंडळाच्या दि.२८.०२.२०१७ व दि.०६.०६.२०१७ रोजीच्या बैठकीत खालील विविध योजनांच्या कामाचे RFP डॉक्युमेंटस तयार करण्याबाबत मान्यता देण्यात आली. |



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | १. बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ व असंघटित कामगार मंडळ यांचे दोन वेगवेगळे सुविधा केंद्र स्थापन करण्याऐवजी एकच सुविधा केंद्र स्थापन करणे. सदर सुविधा केंद्र स्थापन करण्यासाठी कार्यालयाची स्थापना व एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसीत करण्यासाठी स्वतंत्र संस्थेची नेमणूक करण्याबाबतचे RFP डॉक्युमेंटस तयार करणे.<br>२. उपकर जमा करण्यासाठी प्रत्येक बांधकामाच्या ठिकाणाचे Mapping करण्याकरीता RFP डॉक्युमेंटस तयार करणे.<br>३. बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी बांधकामाच्या ठिकाणी पाळणाघराची (मोबाईल डे- केअर सिस्टम) सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतची RFP डॉक्युमेंटस तयार करणे.<br>४. बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजना राबविणेबाबतच्या योजनेची RFP डॉक्युमेंटस तयार करणे.<br>५. मंडळास बाहय संस्थेमार्फत मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी संस्था निवडीकरीता RFP डॉक्युमेंटस तयार करणे.<br>मंडळाच्या उपरोक्त मान्यतेनुसार मे. केपीएमजी यांना RFP डॉक्युमेंटस तयार करण्याबाबत कळविण्यात आले होते.<br>दि.२३.०५.२०१६ रोजीच्या पत्रान्वये मे. केपीएमजी यांनी यांनी अतिरिक्त मनुष्यबळाची मागणी केली |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | होती त्या मागणीस अनुसरून मंडळाच्या बैठकीत शासन निर्णयातील मुदत व वेळोवेळी प्राप्त होणारी मुदतवाढ विचारात घेऊन नेमणूकीचे आदेश देण्यात यावेत, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला. त्यानुसार मे केपीएमजी यांना अतिरिक्त मनुष्यबळ नियुक्त करून पुढील कार्यवाही करण्याबाबत दि.१३.०६.२०१७ रोजीच्या पत्रान्वये निर्देशित करण्यात आलेले आहे.<br>माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या शासन निर्णयाची मुदत दि.३० जून २०१७ पर्यंत आहे. त्याबाबत माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे चौकशी केली असता सदर शासन निर्णयास मुदतवाढ देण्यात येणार नसल्याचे सांगण्यात आले आहे. सुधारित ई-निविदा प्रसिध्द करून नवीन पॅनल नियुक्त केले जाणार आहे. सदर कार्यवाहीस ०३ ते ०४ महिन्यांचा कालावधी लागणार आहे.<br>याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या शासन निर्णयाची मुदत दि.३० जून २०१७ रोजी संपली असल्याने मंडळाच्या इतर योजनांच्या RFP डॉक्युमेंटस बनविण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. यास्तव मे. केपीएमजी यांना शासन माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील निविदा प्राक्रिया पूर्ण होईपर्यंत अथवा ०१ जुलै २०१७ पासून पुढील ०६ महिन्यांकरीता मुदत वाढ देण्याबाबत मंडळाच्या मान्यतेस सादर करण्यात येत आहे. तथापि, मे KPMG यांना मुदतवाढ द्यावी किंवा निविदा मागवून संस्था निश्चित करावी याबाबत मंडळाने निर्णय घ्यावा. |



अध्यक्ष

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | याबाबत मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी असे मत स्पष्ट केले की, मंडळाने मंजूर केलेल्या विविध योजनांचे RFP Document तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे अशा वेळी अन्य संस्थेची निवड करणे अथवा सदर कार्यवाही स्थगित ठेवणे उचित ठरणार नाही यास्तव मे. KPMG या संस्थेकडे सोपविलेली कामे पूर्ण करण्यासाठी या पूर्वीच्या अटी व शर्तींच्या अधीन राहून दिनांक ०१.०७.२०१७ पासून पुढील ६ महिन्यांची मुदतवाढ देण्यात यावी.<br>याबाबत सविस्तर चर्चअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचे RFP Document बनविण्यासाठी व Bid Management करण्यासाठी मंडळाने नियुक्त केलेल्या मे. KPMG या IT Consultant संस्थेस मंडळाच्या दिनांक ०६.०६.२०१७ रोजीच्या मंजूर अतिरिक्त मनुष्यबळासह दिनांक ०१.०७.२०१७ पासून पूढील ६ महिन्यांसाठी यापूर्वीच्या अटी व शर्तींच्या अधीन राहून मुदतवाढ देण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| **११.** | **मंडळाच्या सुधारित आकृतीबंधास मंजूरी देण्याबाबत.** | याबाबत मंडळ सचिव यांन असे प्रतिपादन केले की, उपरोक्त विषयासंदर्भात महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम ६२ व कलम ४० द्वारे प्रदान करण्यात आलेलया अधिकाराचा वापर करुन, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार |



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) नियम. २००७ तयार केले असून २०११ रोजी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ या त्रिपक्षीय मंडळाची स्थापना केलेली आहे. त्रिपक्षीय मंडळाचा कार्यकाळ संपल्यानंतर दि.२८.०५.२०१५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे सदर मंडळाची पुनर्रचना करण्यात आलेली आहे.<br>२. इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९९६ च्या तरतुदीनुसार जमिनीचे मुल्य वगळता उर्वरित बांधकामाच्या रकमेवर १% उपकर गोळा करण्याची तरतूद असून, त्यानुसार मंडळाकडे सुमारे रु. ५८२१ कोटी (जून २०१७) इतका निधी उपकरांतर्गत जमा झालेला आहे व ६,१०,७१७ इतके बांधकाम कामगार जून २०१७ पर्यंत नोंदीत आहेत.<br>३. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या आस्थापनेवर मुंबई येथील मुख्यालयासाठी व जिल्हा स्तरावर एकूण ५६ पदांची निर्मिती मंडळस्तरावर करण्यासाठी संदर्भीय दिनांक ०३.१०.२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासन मान्यता देण्यात आली आहे व सदर पदे मंडळस्तरावर भरती करण्यास अटी व शर्तीच्या अधीन राहून शासनाने संदर्भीय दिनांक ०४.१०.२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये सहमती दर्शविली आहे.<br>४. मंडळाचा जिल्हास्तरावर व मुख्यालय स्तरावर स्वतंत्र कर्मचारी वर्ग नसल्याने कामगार आयुक्त |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून मंडळाचे कामकाज अतिरिक्त स्वरुपात करुन घेतले जाते. शासन निर्णय दिनांक ०४.१०.२०१३ नुसार मंडळासाठी मुख्यालयात व विभागीय स्तरावर भरती ५% प्रशासकीय खर्चाच्या अटीमुळे झालेली नाही. उक्त ५६ पदे भरण्याचा वार्षिक खर्च रू.१,८७,८५,३६ आहे.<br>५. उक्त ५६ पदांपैकी सद्यस्थितीत शासन पत्र दि. ६.१२.२०१६ नुसार औरंगाबाद माथाडी मंडळावरील श्री. तेलवाडकर, कार्मिक अधिकारी यांची दि. १३.०१.२०१४ च्या आदेशान्वये प्रतिनियुक्तीने औरंगाबाद व जालना जिल्हयासाठी कामगार कल्याण अधिकारी या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच दि. ३१.०३.२०१६ च्या शासन आदेशान्वये श्री. तांबे, लेखा व वित्त अधिकारी, वर्ग-२ हे प्रतिनियुक्तीने दि. १२.०४.२०१६ रोजी मंडळावर रुजु झाले आहे. तसेच महाराष्ट्र शासन उद्योग ऊर्जा व कामगार विभाग दि. ०४/०३/२०१७ व महाराष्ट्र शासन वित्त विभाग दि. १४/०३/२०१७ च्या आदेशान्वये श्री. श्रीरंगम, सहसंचालक (लेखा व कोषागारे) हे प्रतिनियुक्तीने दि.०५/०४/२०१७ रोजी रुजू झाले आहेत.<br>६. मंडळातील उक्त मंजूर पदांकरिता मंडळाने दिनांक २०.०४.२०१६ रोजीच्या पत्रान्वये १) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील मंजूर पदांकरीता सहायक कामगार आयुक्त, (इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ) (गट-अ) व सरकारी कामगार अधिकारी, (इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ) (गट-ब) या पदांचे सेवाप्रवेश नियम, २०१६, २) महाराष्ट्र इमारत व इतर |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील गट-क संवर्गातील पदांचे सेवाप्रवेश नियम-२०१६ व ३) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील चतुर्थश्रेणी पदांचे सेवाप्रवेश नियम-२०१६ चा सुधारीत मसुदा (इंग्रजी व मराठीमध्ये ) शासनाच्या मान्यतेसाठी दि. ०२/०४/२०१७ रोजी सादर करण्यात आला आहे. सदर नियमास शासन मान्यता मिळाल्यानंतर सदर पदे भरण्याची कार्यवाही मंडळस्तरावर करण्यात येईल.<br>७. मंडळाचा ठराव दि. ७.४.२०१४ व शासन पत्र दि. २८.०८.२०१४ अन्वये मंडळाने जून २०१५ पासून मंडळाच्या मुख्यालयात ३ लिपिक टंकलेखक व ३ डाटा एन्ट्री ऑपरेटर व प्रत्येक जिल्हा कार्यालयात १ लिपिक व १ डाटा एन्ट्री ऑपरेटर तसेच प्रत्येक विभागीय कार्यालयात १ लिपिक व १ डाटा एन्ट्री ऑपरेटर अशी १०० पदे कंत्राटी पध्दतीने मे. ब्रिक्स इंडिया प्रा.लि. कडून बाह्य यंत्रणेकडून भरण्यात आलेली आहेत. त्यांच्या वेतनावरील खर्च दरमहा रु. १४ लाख व वार्षिक रु. १ कोटी ७० लाख आहे.<br>८. मंडळाने दिनांक १.१०.२०१५ रोजीच्या ठरावानुसार उक्त १०० पदाव्यतिरिक्त १५६ कर्मचारी बाहय यंत्रणेद्वारे नियुक्त करण्याचा ठराव केला. त्याप्रमाणे जानेवारी २०१६ पासून बाहय यंत्रणेद्वारे १५६ पैकी फक्त ८८ कर्मचाऱ्यांना (कनिष्ठ लेखापाल, लिपिक टंकलेखक/ डाटा एन्टी ऑपरेटर) शासनाच्या मान्यतेशिवाय नियुक्त केले. यांच्या वेतनावरील खर्च दरमहा सुमारे रु. १५.२८ लाख व वार्षिक रु. १ कोटी ८३ लाख आहे. |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | ९. उक्त ८८ कर्मचा-यांना नियुक्त केल्यासंदर्भात शासनाची मान्यता घेण्यासाठी दि.२९.०३.२०१६ रोजी प्रस्ताव सादर केला होता. त्यास शासनाने दिनांक १९.०५.२०१६ च्या पत्रान्वये एकूण खर्चाच्या ५% इतक्या प्रशासकीय खर्चाच्या मर्यादेत कार्यवाही करणे अपेक्षित आहे, असे मार्गदर्शन केले आहे.<br>१०. मंडळाच्या कामकाजाचा वाढता व्याप विचारात घेता तसेच मा. अध्यक्षांना राज्य मंत्री पदाचा दर्जा देण्यात आल्यामुळे आवश्यक असणारी ४ पदे विचारात घेऊन मंडळाच्या दि.०१.१०.२०१५ रोजीच्या ठरावानुसार मंडळासाठी भरावयाच्या १५६ पदांपैकी जानेवारी २०१६ पासून ८८ पदे भरली आहेत. तथापी उक्त १५६ पदापैकी एकुण ९८ पदे आवश्यक आहेत. सबब,मंडळाने ही ९८ पदे चालु ठेऊन त्यांचे वेतन अदा करण्यास मंडळाच्या दि.१६.०६.२०१६ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यता दिली आहे.<br>११. मंडळातील अपुरे मनुष्यबळ हे मंडळाच्या कामकाजा पुढील मोठे आव्हान आहे. महालेखापाल यांचे लेखा परिक्षण व लोकलेखा समिती समोरील मा.प्रधान सचिव (कामगार) यांची दि. २८.४.२०१६ रोजी काढलेली साक्ष व लोकलेखा समितीला मंडळाचे काम प्रभावी व परिणामकारण ६ महिन्यात करावयाचे दिलेले आश्वासन पाहता, मंडळाकडे स्वत:चे अधिकारी व कर्मचारी मुख्यालय, विभागीय कार्यालय व जिल्हा पातळीवर असणे आवश्यक आहे. या कार्यालयाच्या संदर्भिय दिनांक ०९.०८.२०१२ च्या पत्रान्वये मुख्य कार्यालयाकरिता २८ व जिल्हा कार्यालयाकरिता ५४ अशी एकूण ८२ पदांची मागणी करण्यात आली होती. तथापि, शासनाने ५६ |

अध्यक्ष

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | पदांची मंजुरी दिली आहे.तथापि प्रस्तावित ८२ पदे व मंजूर ५६ पदे ही मंडळाचे कामकाज पाहता पुरेशी नाही.<br>१२. भारताच्या महालेखाधिकाऱ्यांनी (CAG) त्यांच्या क्षेत्रिय लेखपरिक्षण अहवालात मंडळाचे कामकाज व गरजा हाताळण्यासाठी मंडळात स्वत:चे आस्थापनेवर पूर्णवेळ कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांचा अभाव आणि हिशोब व लेख्यांवर अंतर्गत नियंत्रण ठेवण्यासाठी अतिशय अपुरी प्रणाली हीच असल्याचे नमुद केले आहे. मंडळाचा वाढता व्याप विचारात घेता मंजूर करण्यात आलेली ५६ पदे व नियुक्ती केलेल्या १८८ कंत्राटी कर्मचाऱ्यांची व्यवस्था पुरेशी नाही. त्यामुळे सुधारीत आकृतीबंध तयार करण्याची मंडळाला गरज भासली आहे.<br>१३. मंडळाच्या दि. १६.०६.२०१६ च्या बैठकीत २८७ पदांचा सुधारित आकृतीबंधास मान्यता देण्यात येऊन सुधारीत आकृतीबंधाचा प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी संदर्भिय क्र.३ दि. ०१/०७/२०१६ च्या पत्रान्वये सादर करण्यात आला आहे.<br>१४. त्यानुसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचा मुख्यालय, विभागीय व जिल्हास्तरावर पुरेसा असा त्रिस्तरीय संरचनेचा व आवश्यक अधिकारी व कर्मचारी नुसार सुधारीत आकृतीबंध शासन मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे.<br>तथापि, मा. प्रधान सचिव (कामगार) यांच्या बरोबर दि. ०२.०६.२०१७ रोजी झालेल्या चर्चेनुसार |



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | असंघटीत कामगाराकरीता इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाबरोबरच विकास आयुक्त (असंघटीत कामगार) यांचे एकत्रित कार्यालये जिल्हा स्तरावर व प्रादेशिक कार्यालये (मुंबई/पुणे/नाशिक/नागपूर/अमरावती/औरंगाबाद) निर्माण करण्यात यावीत व त्याप्रमाणे सुधारीत आकृतीबंधाचा प्रस्ताव त्वरीत सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्याप्रमाणे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकाकरी मंडळाचा मुख्यालय मुंबई व ६ प्रादेशिक कार्यालये व ४० जिल्हा कार्यालयाकरीता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ व असंघटीत कामगार मंडळ यांचे एकत्रित कार्यालय निर्माण करण्यासाठी सुधारीत आकृतीबंध पुढीलप्रमाणे आहे.<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकाकरी मंडळाचा मुख्यालय मुंबई येथील ५१ पदांचा आकृतीबंध ( मुख्यालय येथे १८ पदे मंजूर आहेत) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ व विकास आयुक्त (असंघटीत कामगार) यांची ६ प्रादेशिक कार्यालय येथील प्रत्येकी अनुक्रमे ८ व २ एकूण १० पदांचा आकृतीबंध (एकूण ६ प्रादेशिक कार्यालयाकरीता अनुक्रमे ४८ व १२एकूण ६० पदे) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकाकरी मंडळ व विकास आयुक्त (असंघटीत कामगार) यांची ४० जिल्हा कार्यालय येथील प्रत्येकी अनुक्रमे ८ व ५ एकूण १३ पदांचा आकृतीबंध (इवईबांकाकमं यांची जिल्हा स्तरावर १९ स.का.अ. (इवईबांकाकमं) व १९ लिपिक टंकलेखक अशी ३८ पदे मंजूर )महाराष्ट्र इमारत व इतर |



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | बांधकाम कामगार कल्याणकाकरी मंडळ व विकास आयुक्त (असंघटीत कामगार) यांचा मुख्यालय, प्रादेशिक कार्यालय व जिल्हा कार्यालय येथील पदांचा आकृतीबंध. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांचा मुख्यालय, प्रादेशिक कार्यालय व जिल्हा कार्यालय येथील पदांचा आकृतीबंध. विकास आयुक्त (असंघटीत कामगार) यांचे प्रादेशिक कार्यालय व जिल्हा कार्यालय येथील पदांचा आकृतीबंध. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ व विकास आयुक्त (असंघटीत कामगार) यांचा मुख्यालय, प्रादेशिक कार्यालय व जिल्हा कार्यालय येथील एकूण पदे व वार्षिक खर्च. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ येथील मंजूर व नविन पदांचा एकूण पदे व वार्षिक खर्च. विकास आयुक्त (असंघटीत कामगार) यांचा प्रादेशिक कार्यालय व जिल्हा कार्यालय येथील एकूण पदे व वार्षिक खर्च. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ व विकास आयुक्त (असंघटीत कामगार) यांनी त्याप्रमाणे सदर पदे निर्माण केल्यानंतर स्वतंत्रपणे खर्च करावयाचा आहे.<br>१५. मंडळ मुख्यालय :- शासनाने मंडळाकरीता मंजूर केलेली ५६ पदे भरण्यासाठी सेवाप्रवेश नियमाचा मसुदा शासनास दि.२०.४.२०१६ रोजी मान्यतेसाठी सादर केलेला आहे. त्याची मान्यता प्राप्त झाल्यानंतर उक्त पदे भरण्यात येतील. तथापि, मंडळाचे दिवसेंदिवस वाढत चाललेले कामकाज व त्याकरिता अपुरे मनुष्यबळ, आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी वर्ग यांचेकडून त्यांचे नियमित कामकाज करुन अतिरिक्त स्वरुपात |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | मंडळाचे करुन घेण्यात येत असलेले कामकाज महालेखापाल यांचे लेखापरीक्षण अहवालामधील आक्षेप व लोक लेखा समितीसमोर दि.२८.०४.२०१६ रोजी मा.प्रधान सचिव (कामगार) यांची झालेली साक्ष व त्यावेळी लोकलेखा समितीला दिलेल्या आश्वासनानुसार तसेच लोकलेखा समितीने दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही ३ ते ६ महिने करावयाची आहे व उक्त सर्व वस्तुस्थिती महालेखापाल यांचेआक्षेप,लोकलेखा समितीने दिलेल्या सुचना विचारात घेता मंडळाला मनुष्यबळासाठी नव्याने आकृतीबंध निर्माण करण्याची आवश्यकता असून मंडळ सक्षम करण्यासाठी ते आवश्यक आहे.<br>१६. सद्य:स्थितीत बाहय यंत्रणेद्वारा कर्मचारी नियुक्ती करुन तसेच आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी यांचेकडून त्याचे २६ अधिनियमाचे नियमित कामकाज संभाळून मंडळाचे कामकाज पहाणे अतिशय जिकरीचे आहे व मंडळाच्या कामकाज परिणामकारक व प्रभावीपणे होत नाही व त्यावर पर्यवेक्षणही होत नाही. त्यामूळे मंडळाचा स्वत:चा स्वयंपूर्ण परिपुर्ण असा अधिकारी /कर्मचारी वर्ग भरणे आवश्यक आहे. जेणेकरुन आयुक्तालयामधील अधिकारी व कर्मचारी त्यांचे स्वत:चे नियमित कामकाज प्रभावी व परिणामकारक पार पाडून कामगारांना न्याय देवू शकतील. त्याचबरोबर मंडळाची स्वत:ची मनुष्यबळ यंत्रणा निर्माण होईल, जेणेकरुन, भविष्यात सक्षमरित्या काम करेल.<br>१७. आकृतीबंध-त्रिस्तरीय रचना |

अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | शासनामध्ये प्रचलित असल्याप्रमाणे (१)राज्य पातळीवर मंडळाचे मुख्यालय मुंबई, येथे व विकास आयुक्त (असंघटीत कामगार) यांच्यासह एकत्रित (२)प्रादेशिक पातळीवर ६ प्रादेशिक विभागीय कार्यालये व आणि (३) जिल्हा पातळीवर आवश्यकतेनुसार १ अथवा २ ठिकाणी अशी ४० कार्यालये अशी त्रिसूत्री संरचना मंडळासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे<br>१८. मुख्यालय-मुंबई :-६ प्रादेशिक कार्यालये येथे कार्यालय प्रमुख कामगार उप आयुक्त असल्याने-मुख्यालयामध्ये १- सचिव / मुख्य कार्यकारी पद अपर कामगार आयुक्त (श्रेणी १५६००-३९१०० ग्रेड पे ७६००) या दर्जाचे पद आवश्यक असल्याने प्रस्तावित केले आहे.<br>१९. मंडळाचे मुख्यालयामध्ये अपर कामगार आयुक्त या समकक्ष दर्जाचे सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नियंत्रणाखाली संपूर्ण राज्याचे कामकाज चालणार आहे.<br>मुख्यालय स्तरावर मंडळाच्या नोंदणी/नुतनीकरण व कल्याणकारी लाभाचे वाटप व प्रशासन तसेच बैठकीचे कामकाजाकरीता २ स्वतंत्र कक्ष सहाय्यक कामगार आयुक्त यांच्या नियंत्रणाखाली निर्माण करणे आवश्यक आहे व मुख्यालयाकरीता Staff Vehicle ची आवश्यकता आहे.<br>२०. सचिव व अपर कामगार आयुक्त यांच्या करीता मा. अध्यक्ष यांच्याकरीता आवश्यक पदे प्रपत्र १/२ मध्ये दिली आहेत. मुख्यालय स्तरावर अपर कामगार आयुक्त या दर्जाचे सचिव अथवा मुख्य कार्यकारी अधिकारी |

| | | |
|---|---|---|
| | | यांच्या नियंत्रणाखाली इतर अधिकारी व कर्मचारी यांची मंजूर १८ पदाव्यतिरिक्त नवीन ३३ पदांची आवश्यकता असून त्याची माहिती विवरणपत्र क्र. १ मध्ये दिली आहे.<br>२१.लेखा शाखा :- उक्त पदांव्यतिरिक्त मंडळाकडील जमा उपकर रक्कम, कल्याणकारी योजना इत्यादी कामकाज फार मोठया प्रमाणात असून लेखा परीक्षणाची आर्थिक जुळवणी व पडताळणी, अर्थसंकल्पिय योजना इत्यादी सर्व लेखे विषयक बाबींकरिता महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा विभागाचा पुरेसा निष्णात व अनुभवी अधिकारी व कर्मचारी आवश्यक आहेत. लेखा कामकाजाकरिता अधिदान व लेखा कार्यासनाकडून स्वतंत्र अधिकारी/कर्मचारी प्रतिनियुक्तीने घेण्याचे प्रस्तावित आहे.<br>मुख्यालयातील लेखा विभागाकरिता शासनाच्या महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा विभागातील सहाय्यक संचालक, (लेखा) वर्ग-१ वेतनश्रेणी १५६००-३९१०० व ग्रेड पे ५४०० ची आवश्यकता आहे. मंडळाच्या आस्थापनेवर मुख्यालयात, सद्य:स्थितीत लेखा व वित्त अधिकारी (वर्ग -२) १ पद मंजूर असून ते हाराष्ट्र वित्त व लेखा सेवा विभागामार्फत प्रतिनियुक्तीने दि.१२.०४.२०१६ पासून भरले आहे. तथापि मंडळाचे कामकाज पाहता उक्त एक पद पुरेसे नसून लेखा विषयक बाबी हाताळण्यासाठी सहाय्यक संचालक (लेखा) वर्ग-१, यांच्या नियंत्रणाखालील महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा विभागातील प्रतिनियुक्तीने इतर अधिकारी व कर्मचारी यांची आवश्यकता आहे. जेणे करुन मुख्यालय प्रादेशिक जिल्हा कार्यालयाची लेखा विषयक कामकाज तपासणी करता येईल. |

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | २२.विधी विभाग:-मंडळाकडे स्वत:चा विधी अधिकारी असणे आवश्यक आहे, जेणेकरुन मंडळास तातडीने तज्ञ, सक्षम व अधिकृत कायदेशिर सल्ला उपलब्ध होईल. जेणेकरुन न्यायालया बरोबर इतर प्रकरणामध्येही कायदेशिर सल्लागाराची अतिशय मोलाची मदत वेळेवर होईल. त्याकरिता शासनाच्या विधी व न्याय विभागाच्या अवर सचिव (विधी) या संवर्गातून विधी अधिकारी वर्ग-१ प्रतिनियुक्तीने भरण्यात यावा<br>२३.प्रादेशिक विभाग कार्यालये :-प्रादेशिक विभाग कार्यालय (कोकण विभाग) मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती व नाशिक ,औरंगाबाद या ६ ठिकाणी प्रस्तावित असून सद्य:स्थितीत उक्त ठिकाणी तेथे एकही पद मंजूर नाही. तेथे कामगार उप आयुक्त (इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ) यांच्या नियंत्रणाखाली इतर अधिकारी व कर्मचा-यांची प्रत्येक प्रादेशिक कार्यालयात ८ व विकास आयुक्त (असंघटीत कामगार) यांच्या करीता २ अशी प्रत्येक प्रादेशिक कार्यालयात १० पदांची अशी एकूण ६० पदांची आश्वयकता आहे.<br>२४. प्रादेशिक विभागीय कार्यालयाकडे सद्य:स्थितीत १ ही पदे मंजूर नाही मंडळाने प्रत्येक जिल्हा/जिल्हा कार्यालयाकडून माहिती घेवून प्रत्यक्ष नियंत्रण/सनियंत्रण/तपासणी करण्याऐवजी प्रादेशिक विभाग स्तरावर कार्यालय निर्माण करुन उक्त मंडळाचे कामकाज त्यांच्या पर्यवेक्षीय नियंत्रणाखाली असावे. उक्त प्रादेशिक विभागीय कार्यालयावर मंडळाचे मुख्य नियंत्रकाचे पर्यवेक्षण राहिल. प्रादेशिक विभागातील मंडळाच्या कामकाजाची नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी, आवश्यक तपासणी. |

अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | पर्यवेक्षण व नियंत्रणाचे कामकाज प्रभाविपणे व परिणामकारकरित्या करता येईल.<br>२५.जिल्हा कार्यालय:-जिल्हा कार्यालयामध्ये सहाय्यक कामगार आयुक्त (इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ) यांचे नियंत्रणाखाली कार्यालय निर्माण करावयाचे आहे.<br>मंडळाच्या नोंदणी व नुतनीकाणाचे कामकाज हे दिवसेंदिवस वाढत असून मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांच्या लाभासाठी मोठया प्रमाणावर अर्ज प्राप्त होत आहेत. उक्त अर्जांची नोंदणी , नुतनीकरण व पडताळणी करण्यासाठी कर्मचा-यांची आवश्यकता आहे. जेणे करुन बोगस क्लेम होणार नाहीत व पात्र लाभार्थ्यांना कल्याणकारी योजनांचे लाभ होईल व पात्र कामगारांची नोंदणी व नुतनीकरण करता येईल. तसेच मंडळाच्या कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करता येईल.<br>२७. सबब, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळावर सद्य:स्थितीत गट-अ, गट-ब, गट-क व गट-ड अशी राज्य शासनाने समकक्ष ५६ पदे निर्माण करुन भरण्यास शासन निर्णय दि. ३.१०.२०१२ व ४.१०.२०१२ अन्वये मान्यता दिली आहे. उपरोक्त वस्तुस्थिती मंडळाचे कामकात पाहता उक्त पदे अपूर्ण असून सद्य:स्थितीत कामगार आयुक्त कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचेकडून कामकाज करुन घेण्यात येते. तसेच बाहय यंत्रणेद्वारे जून,२०१५ पासून १०० पदे व जानेवारी २०१६ पासून ८८ पदे मुख्यालय, विभागीय कार्यालये व जिल्हा कार्यालयांमध्ये कार्यरत आहेत. तरीही उक्त मंडळाचे कामकाज वेळेत, प्रभावी व |

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | परिणामकारक होत नाही.<br>२८. मंडळाने सद्य:स्थितीमध्ये ५% अटीमुळे मंजूर पदे भरण्यात आली नाहीत. तथापि मंडळाकडील कल्याणकारी योजना वाढत असून नोंदणीही वाढली असल्यामुळे मंडळाच्या कल्याणकारी योजनांवरील खर्चही वाढत जाणार आहे. त्यामुळे ५% मर्यादेमध्ये खर्चा पेक्षा ही अधिक खर्च होणार असल्यास मंडळाकडे स्वत:चा अधिकारी व कर्मचारी वर्ग असणे आवश्यक आहे.<br>२९. मंडळाने सध्या प्रत्येक जिल्हामध्ये वकर्स फॅसिलिटेशन सेंटर (WFC) तयार करणेबाबत प्रस्ताव शासन सादर केला आहे. सदर प्रस्तावामध्ये प्रत्येक जिल्हामध्ये १ सरकारी कामगार अधिकारी (इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ) १ लिपिक टंकलेखक व १ डाटा एन्ट्री ऑपरेटर असे प्रस्तावित असून उक्त वर्कर्स फॅसिलिटेशन सेंटर (WFC) साठी खर्च हा प्रशासकीय खर्चाच्या ५% खर्चाच्या अटीमधून वगळण्याबाबत प्रस्तावित केलेले आहे. तथापि उपरोक्त प्रमाणे सुधारीत आकृतीबंधाप्रमाणे इवइबाकाकमं व विकास आयुक्त (अ.का.) यांची एकत्रित जिल्हास्तरावर प्रस्तावित केल्याप्रमाणे कार्यालय करुन त्यामध्येच WFC व इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ/असंघटीत कामगारांकरीता कार्यालय होईल. त्यामुळे स्वतंत्र WFC कार्यालय करण्याची आवश्यकता नाही.<br>३० .Integrated IT Solution:- मंडळाने Integrated IT Solution (एकात्मीक माहिती व तंत्रज्ञान |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | संगणकीकरण प्रणाली) विकसित करण्याबाबत प्रस्तावित असून त्याद्वारे बाहय यंत्रणेद्वारे बांधकाम कामगारांची नोंदणी व नुतनीकरण, विविध कल्याणकारी योजनांचे प्राप्त लाभार्थ्यांचे अर्ज स्वीकारणे त्यांची छाननी, पडताळणी करणे व लाभाचे वाटप करणे तसेच मंडळाकडे सेस अधिनियमांतर्गत जमा होणारा उपकरावर नियंत्रण ठेवणे तसेच बांधकाम कामाची परवानगी देण्याच्या सक्षम प्राधिका-यांकडून ज्या बांधकाम कामाना परवानगी दिलेली आहे. तेथील नियोक्ता (Builder/Developer, कंत्राटार) यांना इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम,१९९६ अंतर्गत नोंदणी करण्याबाबत माहिती घेऊन त्यांना नोंदणी करण्याची कार्यवाही बाबत पाठपूरावा इत्यादीचा उक्त Integrated IT Solution मध्ये समावेश आहे.<br>३१. सद्यस्थितीत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकाकरी मंडळ येथे मुख्यालय व जिल्हास्तरावर गट अ संवर्गात १ पद, गट ब संवर्गात २१ पदे, गट क संवर्गात ३० पदे व गट ड संवर्गात ४ पदे अशी ५६ पदे मंजूर आहेत. उक्त पदाव्यतिरीक्त मुख्यालय व ६ प्रादेशिक कार्यालय तसेच ४० जिल्हा कार्यालये येथे मिळून सर्व संवर्गातील ३६३ नविन पदे अशी एकुण ४१९ पदांची आवश्यकता आहे.<br>३२. सद्य:स्थितीत इमारत व इतर बांधकाम कामगार मंजूर गट अ ते ड मधील एकूण ५६ मंजूर पदांचा अंदाजे वार्षिक खर्च रुपये १,९५,५७,३१४/- (रु. एक कोटी पंच्याण्णव लाख सत्तावण हजार तीनशे चौदा फक्त)आहे. त्याव्यतिरीक्त सर्व संवर्गातील एकुण नविन ३६३ पदे निर्माण करण्यासाठी अंदाजे वार्षिक खर्च रु. |

**अध्यक्ष**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | ८,१७,४८,१०४/- (आठ कोटी सतरा लाख अठ्ठेचाळीस हजार एकशे चार फक्त) असा आहे. त्यामुळे उपरोक्त प्रमाणे एकुण ४१९ पदांसाठी वार्षिक खर्च रु. १०,१३,०५,४१८/- (रु. दहा कोटी तेरा लाख पाच हजार चारशे अठरा फक्त) होईल.<br>तसेच विकास आयुक्त (असंघटीत कामगार) यांचे उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे इवइबाकाकमं व विकास आयुक्त (अ.का.) अशी एकत्रित ६ प्रादेशिक कार्यालये व ४० जिल्हा कार्यालये करीता विकास आयुक्त (अ.का.) यांच्या आस्थापनेवर सर्व संवर्गाचे एकुण २१२ पदांची आवश्यकता आहे. सदर नविन २१२ पदांचा एकूण खर्च रु. ६२०४५१७६/- (रुपये सहा कोटी वीस लाख पंचेचाळीस हजार एकशे शहात्तर फक्त) होईल.<br>सबब, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांचे मुख्यालय येथील ५१ पदे व विकास आयुक्त (असंघटीत कामगार) यांचेसह उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे इवइबाकाकमं व विकास आयुक्त (अ.का.) अशी एकत्रित ६ प्रादेशिक कार्यालये व ४० जिल्हा कार्यालये येथील अनुक्रमे ३६३ व २१२ अशी एकुण ५७५ पदे धरुन एकुण ६३१ पदांकरीता एकुण वार्षिक खर्च रु.१६३३५०५९४/- (रुपये सोळा कोटी तेहतीस लाख पन्नास हजार पाचशे चौ-याण्णव फक्त) होईल.<br>३३. सबब, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचा दिवसेंदिवस वाढत असलेला व्याप, मंडळाकडे जमा होणार उपकर व बांधकाम कामगारांची नोंदणी व नुतनिकरण व त्या अनुषंगिक |



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ अदा करण्यासाठी मंडळाची सक्षम मनुष्यबळ यंत्रणा निर्माण करण्यासाठी तसेच असंघटीत कामकारांकरीता इवइबाकाकमं व विकास आयुक्त (अ.का.) यांची एकत्रित ६ प्रादेशिक व ४० जिल्हा कार्यालये निर्माण करण्याकरीता प्रस्तावित केल्याप्रमाणे उक्त सुधारीत आकृतीबंधाच्या मसूद्यास मान्यता देण्याबाबत बैठकीत ठराव घेण्यास्तव प्रस्तावित आहे.<br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: मंडळाचे मुख्यालयकरीता ५१, ६ प्रादेशिक कार्यालयाकरीता १८ व ४० जिल्हा कार्यालयाकरीता ३२० असे एकूण ४१९ पदांच्या सुधारित आकृतीबंधास व अंदाजित अपेक्षित वार्षिक खर्च रु.१०,१३,०५,४१८/- एवढया रक्कमेस सर्वानुमते मान्यता देण्यात यावी व सुधारित आकृतीबंधात प्रस्तावित ज्या पदांचे सेवाप्रवेश नियम तयार करणे आवश्यक आहे ते तयार करून सुधारित आकृतीबंध व सेवाप्रवेश नियम मंजूरीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| १२. | **मंडळाने गुंतवणूक केलेल्या मुदत ठेव गुंतवणूकीचा गोषवारा सादर** | याबाबत मंडळ सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या असे निदर्शनास आणून दिले की, दि. ०३.०५.२०१७ च्या मंडळ बैठकीमध्ये दि. ०२.५.२०१७ पर्यंतची मंडळाने केलेल्या एकूण रक्कम रु. ५०५० कोटी मुदत ठेव गुंतवणूकीची माहिती सादर करण्यात आली होती. सदर गुंतवणूकीस व गुंतवणूकीच्या व्याजदरास सर्वानुमते मान्यता प्रदान केलेली आहे. |



**अध्यक्ष**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | |
|---|---|
| करणेबाबत. | मंडळाच्या मंजूर ठरावानुसार गुंतवणूकीचा गोषवारा दि. ३०.०५.२०१७ रोजी शासनास सादर करण्यात आला. दि. १७.०५.२०१७ रोजी मा. मंत्री महोदय. (कामगार) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई येथे मंडळाच्या मुदत ठेव गुंतवणूकीच्या उपसमितीच्या बैठकीमध्ये अतिरिक्त निधीच्या गुंतवणूकीचे निकष ठरविण्यात आले व सदर निकषास मंडळाच्या दि.०६.०६.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यता प्रदान करण्यात आली. सदर निकष खालीलप्रमाणे:<br>१.मंडळाच्या अतिरिक्त निधीची गुंतवणूक केवळ राष्ट्रीयकृत बँकेत करण्यात यावी.<br>२. कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेतील एकूण गूंतवणूक रु. ५०० कोटी पेक्षा जास्त असू नये.<br>३. कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेमध्ये एका वेळची गुंतवणूक रू. ५०० कोटीपेक्षा जास्त असू नये.<br>मंडळाकडील रु. ५०५० काटी मुदत ठेव गुंतवणूकीपैकी माहे जुन २०१७ मध्ये परिपक्व झालेल्या मुदत ठेवींच्या व्याजासह रक्कमा खालील प्रमाणे |

| अनु क्र. | बँकेचे नाव | FDR No. | गुंतवणूक दिनांक | परिपक्व दिनांक | गुंतवलेली रक्कम (रू.कोटीत) | व्याज दर द.सा. द.शे. | गुंतवणूकीच्या परिपक्वतेनंतर मिळणारी रक्कम (रू. कोटीत) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सेंट्रल बँक ऑफ | L०९०३७९ | २२.०६.२०१६ | २२.०६.२०१७ | ५०० | ७.०० | ५३५.९२ |



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | इंडिया | | | | | | |
| २ | युको बँक | ०९७२६९ | २४.०६.२०१६ | २४.०६.२०१७ | ८५० | ७.०५ | ९११.५२ |
| ३ | युनियन बँक ऑफ इंडिया | २४१००१ | २४.०६.२०१६ | २४.०६.२०१७ | २०० | ७.०५ | २१४.४७ |
| | | | | एकूण | १५५० | | १६६१.९१ |

वरीलप्रमाणे गुंतवणूकीवरील परिपक्व झालेली रक्कम व उपकरांतर्गत व व्याजा पोटी जमा झालेली रक्कम रु. रु.१७०० कोटी मुदत ठेवीमध्ये गुंतवणूक करण्यासाठी दि. २९.०६.२०१७ रोजी गुंतवणूकीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस २१ राष्ट्रीयकृत बँकाच्या Zonal व Regional बँक प्रतिनिधींना बोलविण्यात आले होते त्यापैकी ७ बँकाचे प्रतिनिधी उपस्थित होते सदर बैठकीमध्ये दि .१७.०५.२०१७ रोजी गुंतवणूकीच्या उपसमितीच्या बैठकीत ठरलेल्या निकषानुसार रु. ५०० कोटी एवढा निधी अधिकतम व्याजदर असलेल्या युनियन बँक ऑफ इंडिया, डॉ. आंबेडकर रोड, बांद्रा (प) मुंबई यांजकडे गुंतवणूक करण्याचा व उपस्थित बँक प्रतिनिधींनी उर्वरित गुंतवणूकीसाठी उच्चतम व्याजदर देण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे रक्कम रु. १२०० कोटीची गुंतवणूक लवकरच घेण्याबाबतचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

माहे जून २०१७ अखेर मंडळाच्या रु. ४६५० कोटी एवढया अतिरिक्त निधीची गुंतवणूक खालील राष्ट्रीयकृत व



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

खाजगी शेडयुल्ड बँकामध्ये एक वर्षासाठी गुंतवणूक करण्यात आली आहे.

| अनु क्र. | बँकेचे नाव | FDR No. | गुंतवणूक दिनांक | परिपक्व दिनांक | गुंतवलेली रक्कम (रू.कोटीत) | व्याज दर द.सा. द.शे. | गुंतवणूकीच्या परिपक्वते नंतर मिळणारी रक्कम (रू. कोटीत) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | इंडसइंड बँक | ३००७१७६५६८३६ | ०४.०१.२०१७ | ०४.०१.२०१८ | १००० | ६.५० | १०६६.६० |
| २. | येसबँक | ०२६८४०४००००८२१५ | ०४.०१.२०१७ | ०४.०१.२०१८ | ५०० | ६.५० | ५३३.३० |
| ३. | बँक ऑफ इंडिया | ००४२४५११००१४४३५ | ०२.०५.२०१७ | ०२.०५.२०१८ | १००० | ५.१० | १०५१.९८ |
| ४. | एच.डी. एफ. एफ. सी.बँक | ५०३००१९६२८४६७२ | ०२.०५.२०१७ | ०२.०५.२०१८ | १००० | ६.९१ | १०७०.९१ |
| ५. | सिंडीकेट बँक | SBN४९९१०४ | ०४.०५.२०१७ | ०४.०५.२०१८ | ३९० | ५.६५ | ४१२.५० |



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६. | कोटक महिंद्रा बँक | १५१२०२२६५८ | ०४.०५.२०१७ | ०४.०५.२०१८ | २६० | ६.९० | २७८.४० |
| ७. | युनियन बँक ऑफ इंडिया | ०३९९०१ | २९.०६.२०१७ | २९.०६.२०१८ | ५०० | ५.९० | ५३०.१५ |
| | | **एकूण** | | | **४६५०** | | **४९४३.८४** |

दि. २९.०६.२०१७ रोजी केलेल्या गुंतवणूकीशिवाय शिल्लक रक्कम रु. १२०० कोटी व दरम्यानच्या कालावधीत जमा उपकराची रक्कम रु. १०० कोटी (मंडळाच्या दैनंदीन खर्चाकरीता रु. १०६ कोटी वगळून) अशी एकूण रु. १३०० कोटीची गुंतवणूक दि. १५.०७.२०१७ च्या बेठकीत करणे प्रस्तावीत आहे.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: मंडळाच्या अतिरिक्त निधीची उपसमितीच्या मान्यतेने केलेली गुंतवणूक व त्याबाबतचा गोषवारा मंजूर करून त्रैमासिक अहवाल शासनास सादर करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| | | |
|---|---|---|
| **१३.** | **इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाअंतर्गत सहाय्यक कामगार** | याबाबत मंडळ सचिव यांनी सर्व उपस्थितांना असे सांगितले की, **सहाय्यक कामगार आयुक्त, सांगली** येथील कार्यालयामध्ये इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या कामकाजामध्ये झालेल्या अनियमयतेबाबत कामगार आयुक्त तथा अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांनी दि.२५.०५.२०१५ च्या पत्राव्दारे नोंदित झलेल्या बांधकाम कामगारांना मंडळामार्फत देण्यात येणारे |



**अध्यक्ष**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | **आयुक्त, सांगली व सहाय्यक कामगार आयुक्त, अहमदनगर यांच्या कामकाजातील अनियमिततेबाबतचा चौकशी अहवाल मंडळाच्या माहितीस्तव सादर करणेबाबत.** | लाभ देण्यापुर्वी त्यांची पुन्हा एकदा बांधकाम कामगार असल्याची खातर जमा करुन त्यांना लाभ प्रदान करावेत व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मंडळास सादर करणेबाबतचे निर्देश दिलेले होते.<br>त्या अनुषंगाने श्री. व्ही. सी. पनवेलकर,सहाय्यक कामगार आयुक्त. सातारा यांच्या नियंत्रणाखाली चौकशी समिती गठीत करण्यात आलेली होती. सदर चौकशी समितीने अप्पर कामगार आयुक्त, पुणे यांना सादर केलेला अहवाल व त्या अर्थी त्यांनी दि.०३/१२/२०१६ रोजी मा. कामगार आयुक्त, मुंबई यांना सादर केलेला अहवालाच्या अनुषंगाने, मा. कामगार आयुक्त यांनी दि.०७/०६/२०१७ रोजीच्या गोपनीय अहवालाव्दारे मा. प्रधान सचिव (कामगार) उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय , मुंबई यांना सादर केलेला अहवालातील आढळुन आलेल्या बाबी खालील प्रमाणे |

| **चौकशी अहवालात आढळुन आलेल्या बाबी.** |
|---|
| संपुर्ण नोंदणी अर्ज व लाभाचे अर्ज उपलब्ध नसणे |
| बँक स्टेटमेंटनुसार वाटप केलेल्या रकमा परत RTGS न झाल्याने योजनेच्या लाभाची रक्कम मंडळाच्या खात्यात परत आल्याचे दिसुन येते. परंतु सदर योजनेचा लाभ पुन्हा संबंधित लाभार्थींना RTGS व्दारे अदा करण्यात आले किंवा नाही, याबाबतचे माहिती उपलब्ध् नसणे. |
| परिणामी कॅशबुक अपुर्ण असणे. |
| उपलब्ध असलेल्या लाभाचे अर्ज यामधील लाभार्थींची माहिती - पुर्ण नाव व नोंदणी क्रमांक बँक स्टेटमेंट मध्ये नसणे. |
| दि. ०५/०६/२०१४ ते ३०/६/२०१६ या कालावधीतील बँक स्टेटमेंट नुसार लाभ वाटप केलेल्या |

अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | लाभार्थी कामगारांची एकुण संख्या - ८६२८.<br>८६२८ लाभार्थीना लाभ वाटप करण्यात आलेल्या लाभाची रक्कम – रु.५,४०,६७,४५०/-<br>८६२८ पैकी ४४१७ लाभार्थी कामगारांची नोंदणी सकृत दर्शनी अवैध ठरलेली आहे.<br>८६२८ पैकी ३८६९ कामगारांचे नोंदणी अर्ज उपलब्ध नाही. ३८६९ कामगारांना वाटप झालेली लाभाची रक्कम रु.४,१०,७७,१००/-<br>बँक स्टेटमधील २५ यादयाप्रमाणे ५०१ लाभार्थीना RTGS व्दारे रक्कम रु.४५,५३,८५०/- रकमेचे वाटप झल्याचे आढळुन आलेले आहे. |
| | | एकुण आर्थिक नुकसान - ४,१०,७७,१०० (उपलब्ध नसलेल्या अर्जांना लाभ वाटप)<br>+ ४५,५३,८५०<br>४,५६,३०,९५०/- (एकुण आर्थिक नुकसान) |
| | | दि.०३.१२.२०१६ रोजी सादर केलेला अहवाल/माहिती स्वयंस्पष्ट व परिपुर्ण नसल्याने,दि.०२.०३.२०१७ रोजी श्री. बी. आर. देशमुख, अप्पर कामगार आयुक्त (प्रभारी),पुणे ; श्री. व्ही. सी. पनवेलकर, सहाय्यक कामगार आयुक्त, सातारा यांच्या नियत्रंणखाली पुन्हा चौकशी पथक स्थापन झाले. |
| | | १२.सदर चौकशी पथकाने दि.१४/०५/२०१७ सादर केलेल्या अहवालात नमुद केल्याअन्वये-<br>सन २००८ ते ऑगस्ट २०१६ अखेर एकुण १८२४३ बांधकाम कामगारांची लभार्थी म्हणुन नोंदणी करण्यात आली.<br>ब) सदर चौकशी अहवाला अन्वये एकुण लाभार्थीची संख्या – ८४०६.<br>क) एकुण नोंदित कामगारांपैकी विविध कारणास्तव अवैध नोंदणी ठरलेल्या कामगारांची संख्या – १७५९०. |



अध्यक्ष

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| |
|---|
| ड) तसेच, गहाळ झाल्याने तपासणीकरीता उपलब्ध न झालेले अर्ज-२२७८. |
| १३.अवैध नोंदणी झालेल्या १७५९० कामगारांना विविध योजनेखाली वाटप केलेली रक्कम रु. २,२१,७१,३५०/- |
| १४. RTGS व्दारे ५०१ लाभार्थी कामगारांना रक्कम रु. ४५,५३,८५०/- लाभ वितरीत करण्यात आलेले आहेत व सदर ५०१ लाभार्थींचे मुळ नोंदणी अर्ज उपलब्ध नसणे. |
| १५.मा. कामगार आयुक्त, यांनी शासनास सादर केलेला अहवालानुसार – अवैध बांधकाम कामगारांची नोंदणी व लाभाचे वाटप केलेल्या तसेच गहाळ नोंदित अर्जाबाबत संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना ज्ञापन बजावुन त्यांचे कडुन खुलासे घेण्यात येत असुन, त्यांचे कडुन खुलासे प्राप्त झाल्यानंतर संबंधितां विरुदध् करावयाच्या कार्यवाहीबाबत शासनास सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात येईल असे नमुद केले आहे. |

**सहाय्यक कामगार आयुक्त अहमदनगर** येथील कार्यालयामध्ये इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या कामकाजामध्ये झालेल्या अनियमतेबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी करणेसाठी मा. कामगार आयुक्त यांनी दि.१६.०४.२०१६ रोजीच्या आदेशान्वये श्री. अ.के.पेंडसे, का.उ.आ, मुंबई व श्री.चं.अ.राऊत, स.का.आ., मुंबई यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिलेले होते. त्या अन्वये त्यांनी दि.१५.०७.२०१६ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने अहवाल शासनास सादर केलेला आहे. सदर अहवालाचे अवलोकन केले असता कामगार आयुक्तांना सदर अहवाल परिपूर्ण नसल्याचे आढळून आल्याने त्याअनुषंगाने सविस्तर चौकशी करुन अहवाल सादर करणे बाबतचे निर्देश कामगार उप आयुक्त, नाशिक यांना कामगार आयुक्तांनी दिलेले आहे. त्या अन्वये कामगार उप आयुक्त, नाशिक यांनी कामगार



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

//

आयुक्तांना दि.०७.०७.२०१६ रोजी अहवाल सादर केलेला, सदर अहवालामध्ये त्रुटी आढळुन आल्याने, कामगार आयुक्तांनी दि. १६.०९.२०१६ रोजीच्या पत्रान्वये सर्व अर्जांची पुर्नतपासणी करुन स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार श्री. जे.जे.दाभाडे, का.उ.आ., नाशिक यांनी त्यांच्या दि.१६.०५.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सदर चौकशी अहवाल कामगार आयुक्तांना सादर केला.

सदर अहवालाच्या अनुषंगाने मा.कामगार आयुक्तांनी त्यांच्या दि. ०७.०६.२०१७ रोजीच्या गोपनीय अहवालाव्दारे मा. प्रधान सचिव (कामगार), उदयोग, उर्जा व कामगार विभाग यांना सादर केलेल्या चौकशी अहवालातील आढळुन आलेल्या बाबी खालील प्रमाणे आहेत.

चौकशी अहवालात आढळुन आलेल्या बाबी –

| |
|---|
| सन २०११ पासुन कामगारांची नोंदणी करण्यात आलेली असुन, ठेवण्यात आलेल्या रजिस्टर नुसार ३१२८० बांधकाम कामगारांना दुरध्वनी / भ्रमणध्वनी वरुन नोंदणी क्रमांक दिल्याचे आढळुन आले. |
| ३१२८० पैकी २८९०० नोंदणी अर्ज कार्यालयात प्राप्त आहेत. |
| दि.०७.०३.२०१२ रोजीच्या पत्रान्वये १६१ अर्ज स.का.आ तथा सचिव, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई कार्यालयाकडे पाठविण्यात आले आहेत. |
| नोंदणी क्रमांक वाटप केलेल्या ३१२८० अर्जांपैकी २२१९ अर्ज अद्याप स.का.आ अहमदनगर यांच्या कार्यालयात अप्राप्त आहेत. |
| २८९०० नोंदणी अर्जांपैकी गृहपयोगी योजनेअंतर्गत ४४९५ अपात्र लाभार्थींना रक्कम रु.१,३४,८५,०००/- लाभ देण्यात आलेला आहे. |



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| | | नोंदणी क्रमांक ४११३ ते ४१४२ असे एकुण ३० नोंदणी क्रमांक कोणत्याही कामगारांस देण्यात आलेले नाही. |
| | | विहीत कागदपत्रांशिवाय १९२७३ कामगारांची नोंदणी करण्यात आल्याचे आढळुन आले आहे. |
| | | १२ कामगारांना गृहापयोगी वस्तु खरेदी योजने अंतर्गतचा लाभ दुबार देण्यात आल्याने ३६०००/- चे नुकसान. |
| | | प्राप्त् झालेल्या २८९०० अर्जापैकी १६२७३ अर्ज विविध कारणांमुळे अवैध ठरलेले आहेत व १२६२७ अर्ज वैध आहेत. |
| | | १०)अप्राप्त २२१९ अर्जापैकी २६५ कामगारांना रक्कम रु. ७९५०००/- लाभाचे वाटप करण्यात आलेले आहे. |
| | | ११) गृहापयोगी वस्तु खरेदी योजनेअंतर्गत प्राप्त ५४४९ लाभार्थ्यांना लाभाचे वाटप करण्यात आलेले आहे. ५४४९ पैकी १४९० अर्ज गहाळ झालेले होते. शोध घेतला असता १४४१ अर्ज आढळुन आले व उर्वरति ४९ अर्ज अद्याप सापडलेले नाही. रक्कम रु.१,९९,४००/- चे नुकसान |
| | | एकुण नुकसान-<br>७,९५,०००/- (अप्राप्त अर्जापैकी २६५ लाभार्थींना लाभ वाटप)<br>१,३४,८५,०००/- (४४९५ अपात्र लाभार्थींना लाभ वाटप)<br>३६,०००/- (रु.३०००/- दुबार लाभ वाटप)<br>१,४३,१६,०००/- ( एकुण आर्थिक नुकसान) |
| | | १३) मा. कामगार आयुक्त यांनी सदर पत्रात नमुद अधिकारी/कर्मचारी यांना कारणेदाखवा नोटीस बजावली असुन, संबंधीताकडुन खुलासे प्राप्त झाल्यानंतर अधिकारी/कर्मचारी यांचे पुढील कार्यवाही करण्याबाबत शासनास यथावकाश प्रस्तावित करण्यात येईल असे शासनास कळविले आहे. |

४२ वी बैठक दिनांक १८.०७.२०१७

**अध्यक्ष**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळांतर्गत सांगली व अहमदनगर येथील विभागीय चौकशी मध्ये आढळून आलेली बाब व त्या संदर्भात करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबतचा उपरोक्त अहवाल मंडळाच्या माहितीस्तव सादर करण्यात येत आहे<br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाअंतर्गत सहाय्यक कामगार आयुक्त, सांगली व सहाय्यक कामगार आयुक्त, अहमदनगर यांच्या कामकाजातील अनियमिततेबाबतचा चौकशी अहवाल मंडळाच्या माहितीस्तव सादर करण्यात आला. सदर माहितीची मंडळाकडून नोंद घेण्यात आली.** |
| **१४.** | **न्यायालयीन प्रकरणांची माहिती मंडळास सादर करणे.** | महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई, कामगार आयुक्त, विकास आयुक्त, कामगार उप आयुक्त, सहाय्यक कामगार आयुक्त, सरकारी कामगार अधिकारी यांच्या विरूध्द राज्यातील कामगार व संघटनांमार्फत एकूण ०४ याचिका व ०१ अवमान याचिका मा. उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या आहेत. सदर याचिका व अवमान याचिकांची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे<br>**याचिका क्र.०१:-** याचिका क्र.९४१६/२०१७ |



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | जनरल कामगार युनियन, सोलापूर<br>विरूध्द<br>मा. प्रधान सचिव,<br>उद्योग, उर्जा व कामगार विभाग,<br>मंत्रालय मुंबई ३२<br>मा. कामगार आयुक्त,<br>कामगार भवन, बांद्र पूर्व<br>मा. विकास आयुक्त (अ.सं.)<br>कामगार भवन, बांद्रा पूर्व<br>सहाय्यक कामगार आयुक्त,<br>सोलापूर<br><br>**मागणी:-**<br>• प्रतिसादक क्र.०४ यांना प्रतिसादक क्र.०१ व ०२ यांनी जनरल कामगार युनियन सोलापूर यांच्या दि.२३.०२.२०१७ रोजीच्या नोटीसद्वारे देण्यात आलेली वैद्यकीय लाभ , शिष्यवृत्ती अर्थसहाय्य, अंत्यविधी अर्थसहाय्य, पेन्शन व मृत कामगाराच्या कायदेशीर वारसास दाव्याबाबतची रक्कम अदा करण्याबाबतचे निर्देश द्यावे.<br>• प्रतिसादक क्र.०१ ते ०३ यांनी सहाय्यक कामगार आयुक्त, सोलापूर कार्यालयामधील अधिकारी/कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी यांचे विरूध्द शिस्तभंगाची कारवाई करावी व त्यांची |

| | | |
|---|---|---|
| | | कामगारांकडून नोंदणी फी जास्त आकारणे, कामगारांचे ओळखपत्र तसेच योजनेचे अर्ज गहाळ करणे व लाभ मिळवून देण्याबाबत रक्कमेची मागणी करणे इ.बाबत सखोल चौकशी करण्यात येऊन दोषी आढळल्यास त्यांना निलंबित करावे.<br>• युनियन व कामगारांमार्फत तक्रार करण्यात आलेली असताना सहाय्यक कामगार आयुक्त सोलापूर कार्यालयातील अधिकारी कर्मचारी यांचेविरूध्द कारवाई का करण्यात आलेली नाही याबाबत कारणीमीमांसा सादर करणे.<br>• तात्पुरते निर्णय पारित करणे.<br>• इतर किंवा समतुल्य निकाल पारित करणे.<br><br>**सद्यस्थिती** :- सदर याचिकेच्या अनुषंगाने सहाय्यक कामगार आयुक्त सोलापूर यांनी तयार केलेले परिच्छेदनिहाय अभिप्राय त्यांच्या दि.०३.०७.२०१७ रोजीच्या पत्रान्वये मा. कामगार आयुक्त यांच्या मंजूरीस्तव सादर केले आहे. त्या अनुषंगाने सहाय्यक कामगार आयुक्त, सोलापूर यांनी मान्यतेस्तव सादर केलेल्या **शपथपत्राच्या मसुद्यास मंडळाने दि.१४.०७.२०१७** रोजीच्या पत्रान्वये मान्यता देऊन सदर शपथपत्र मा. उच्च् न्यायालयात दाखल करण्याबाबत सहाय्यक कामगार आयुक्त सोलापूर यांना कळविले आहे.<br>**याचिका क्र.०२** :- याचिका क्र. १११७०/२०१७<br>श्रीम. उल्का पांडुरंग कांबळे व इतर १७ विरूध्द<br>**विरूध्द**<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई<br>महाराष्ट्र राज्य द्वारा, कामगार आयुक्त, मुंबई |



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

सहाय्यक कामगार आयुक्त, सांगली
सहाय्यक कामगार आयुक्त, कोल्हापूर

**मागणी :-**

- प्रतिसादक क्र.०१ यांनी कामगाराच्या मृत्यू नंतर त्यांचे कायदेशीर वारसास देय असलेल्या अंत्यविधी अर्थसहाय्य रक्कम रू.५०००/- व दरमहा रू.१०००/- प्रमाणे पाच वर्षाकरीता अर्थसहाय्य व मृत कामगाराच्या वारसास रक्कम रू.२,००,०००/- अर्थसहाय्य योजनेंतर्गत लाभाचे वाटप केलेले नाही व सदर लाभ मिळवून देणेकरीता असमर्थता दर्शविलेली आहे.
- मृत कामगाराच्या कायदेशीर वारसास रक्कम रू.२,००,०००/-, अंत्यविधी अर्थसहाय्य योजनेंतर्गत रू.५०००/- व मृत कामगाराच्या वारसास प्रती माह रू.१०००/- चे आर्थिक सहाय्य हे सद्यथितीत जीवन राहणीमानाच्या सुसंगत नसल्याचे असे मत प्रदर्शित केले आहे.
- मृत कामगारांच्या कायदेशीर वारसास देण्यात येणारे आर्थिक सहाय्य हे मोटार वाहन नियम, १९८८ अंतर्गत देण्यात येणाऱ्या नुकसानभरपाई नुसार देण्यात यावे, अशी तरतूद करण्यात यावी.

**सद्यस्थिती :-** सदर प्रकरण प्री ॲडमीशनकरीता दि.३१.०८.२०१७ रोजीची तारीख देण्यात आलेली आहे.

**याचिका क्र.०३ :-** याचिका क्र. -११९७२/२०१६
श्री. संतोष प्रकाश तेली व इतर ११
विरूध्द
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
सहाय्यक कामगार आयुक्त, सांगली
सहाय्यक कामगार आयुक्त, कोल्हापूर
सरकारी कामगार अधिकारी, सिधुदूर्ग



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

महाराष्ट्र शासन, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ३२

- मंडळाने घरबांधणी/ घरदुरूस्ती योजनेंतर्गत ठरवून दिलेली लाभाची रक्कम गणना करताना तुटपुंजी अपुऱ्या स्वरूपात गणना केलेली असल्याचे मत प्रदर्शित केले आहे.
- ग्रामीण भागात घरबांधणीचा अंदाजे खर्च रक्कम रू.१०.०० लाख येतो. म्हाडाची याबाबतची आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी माफक दरात घर उपलब्धतेची योजना राबविली जाते. सदर योजना अंतर्गत मंडळातील नोंदीत कामगारांचा समावेश करण्यात येऊन सदर EWS योजनेंतर्गत लाभार्थींना या योजनेशी जोडून घरबांधणी योजनेचा लाभ रक्कम रू.१०.०० लाख करण्यात यावा.

**मागणी :-**

- घराबांधणी अंतर्गत देण्यात येणाऱ्या आर्थिक सहाय्यतेच्या रक्कमेत वाढ करण्यात यावी. सदर वाढ ही म्हाडाच्या EWS योजनेच्या लाभाच्या रक्कमेच्या बरोबरीने असावी.
- मंडळाने नोंदीत लाभार्थी कामगारांकरीता स्वस्त दराच्या घरांची उपलब्धतेबाबतची योजना लागू करावी.
- घरबांधणी व घरदुरूस्ती कर्ज वाटपाबाबतची

**सद्यस्थिती :-** शपथपत्र तयार करण्यात आले असून प्री ॲडमीशन करीता दि.२८.०७.२०१७ रोजीची तारीख मिळाली आहे.

**याचिका क्र.०४- याचिका क्र. ५४५३/२०१६**

याचिकाकर्ता :- १) श्री. मोहन महादेव कोंगरे
२) श्रीम. अंकिता मोहन कोंगरे

विरूध्द

महाराष्ट्र राज्य व्दारा
कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

अप्पर कामगार आयुक्त, नागपूर

याचिकाकर्ता श्री. मोहन कोंगरे हे महाराष्ट्र इमारत वइतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात नोंदीत असून त्यांनी त्यांचे पाल्य कु.अंकीता कोंगरे यांच्या बी-फार्म शिक्षणाकरीता रू.३५,०००/- अर्थसहाय्य योजनेंतर्गत लाभ मिळण्याकरीता अर्ज केला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने कु. अंकीत कोंगरे यांचे शिक्षण बी-फार्म अभ्यासक्रम वैद्यकीय शिक्षणांतर्गत येत नसल्याने, प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या प्रवेश व पुस्तके खरेदीकरीता रक्कम रू.१५,०००/- अर्थसहाय्य योजनेंतर्गत ग्राहय धरून श्री. मोहन कोंगरे यांना दि.०७.०७.२०१५ रोजीच्य आदेशान्वये रक्कम रू.१५,०००/- चा लाभ दिलेला आहे.

**मागणी** :-

- दि. ०७.०७.२०१५ चे आदेश रददबातल करून पतिसादक क्र.०३ यांनी योजनेंतर्गत रक्कम रू.३५०००/- याचिकाकर्त्यास देण्याबाबतचे आदेश करावेत.
- न्यायालयाला योग्य वाटेल असा निर्णय देणे

**सद्यस्थिती :- दि.०६.०४.२०१७ रोजी शपथपत्र सादर केलेले असून येत्या दि.२४.०७.२०१७ रोजी प्री ॲडमीशनकरीता तारीख मिळालेली आहे.**

**याचिका क्र.०५:-**

अवमान याचिका क्र. १३६५१/ २०१७
जनरल कामगार युनियन, सोलापूर
विरूध्द
मा. प्रधान सचिव,



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय मुंबई ३२
मा. कामगार आयुक्त,
कामगार भवन, बांद्र पूर्व
सहाय्यक कामगार आयुक्त,
सोलापूर

सदर याचिकेच्या अनुषंगाने मा. उच्च् न्यायालयाने दि.२४.१०.२०१६ रोजी मूळ याचिका क्र. ११६८३/२०१६ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारित करून याचिका निकाली काढली होती.

१. We are inclined to disposed of the present writ petition by keeping all contentions open as grivencies raised in the present writ petition have not yet been decided. Therefore, in the interest of justice and to avoid futher delay we are inclined to direct the respondents to decide the representations in accordance to law as early as possible prefrebly within a period of eight weeks.

तथापि, सादर केलेल्या याचिकेच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी सदर प्रकरणी दि.२४.१०.२०१६ रोजी निकाल पारित करून ०८ आठवडयात निर्णय घेऊन व त्यावर अंमलबजावणी करण्याचे आदेश शासनास दिलेले असता. मंडळाने दि.२३.०३.२०१७ रोजीच्या पत्रान्वये आपले अभिप्राय



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | कळविले होते तरी सदर अभिप्रायास उडवाउडवीचे उत्तर दिल्याबाबतचे गृहीत धरून जनरल कामगार युनियन संघटनेमार्फत अवमान याचिका क्र. १३६५१/ २०१७ दाखल करण्यात आली आहे.<br>**सद्यस्थिती :- सदर अवमान याचिकेसंबंधी परिच्छेद निहाय अभिप्राय सादर करण्याकरीता शासनाच्या दि.०१.०७.२०१७ रोजीच्या पत्रान्वये कामगार उपआयुक्त, (ग्रा.वि.) मुंबई यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे. अवमान याचिकेसंदर्भात परिच्छेदनिहाय अभिप्राय/ शपथपत्राचा मसुदा तयार करण्यात येत आहे.**<br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: मंडळाच्या विरोधातील उच्च न्यायालयात सादर उपरोक्त ४ याचिका व १ अवमान याचिकेबाबत सादर वस्तूस्थितीची मंडळामार्फत नोंद घेण्यात आली.** |
| १५. | **न्यायालयीन प्रकरणे हाताळणेकरीता कायदेविषयक सल्लागारांचे पॅनल तयार करण्यास मंडळाची मान्यता घेण्याबाबत.** | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना बांधकाम क्षेत्रातील नोंदीत बांधकाम कामगारांच्या कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करीता करण्यात आली.<br>सदर योजनांची अंमलबजावणी करताना मंडळात नोंदीत कामगारांना ते ज्या योजनेंतर्गत लाभ मिळण्यास पात्र ठरतात त्या योजनेंतर्गत त्यांच्यामार्फत अर्ज करण्यात येतो व मंडळाने ठरवून दिलेल्या अटी शर्तीच्या अधीन राहून सदर योजनांचा लाभ त्यांच्या बँक खात्यावर अदा करण्यात येतो.<br>मंडळांतर्गत जिल्हा कार्यालय स्तरावरून बांधकाम कामगारांची नोंदणी, लाभार्थ्यांच्या अर्जांची छाननी व |



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | विविध कल्याणकारी योजनांचे लाभ वाटप या संदर्भात संबंधित बांधकाम कामगार किंवा बांधकाम कामगार संघटना न्यायालयात दाद मागतात. त्याअनुषंगाने आजतागयत लाभार्थी/ संघटनामार्फत ०४ जनहित याचिका दाखल करण्यात आलेल्या आहेत. त्याबाबतची कार्यवाही/ निकाल न्यायप्रविष्ट आहे.<br>नोंदीत कामगाराकडून/ संघटनेच्या वतीने दाखल करण्यात आलेल्या याचिकाच्या अनुषंगाने त्यावर परिच्छेदनिहाय अभिप्राय मा. उच्च न्यायालयात सादर करणे क्रमप्राप्त आहे. सदर जनहित याचिका व इतर न्यायालयीन प्रकरणी मंडळाची बाजू न्यायालयात मांडण्याकरीता कायदेविषयक सल्लागार यांची नेमणूक करणे प्रस्तावित आहे.<br>सदर कायदेविषयक सल्लागारामार्फत खालील प्रमाणे कामकाज अपेक्षित आहे.<br>१. मंडळास कायदेविषयक सल्ला देणे<br>२. परिच्छेदनिहाय अभिप्राय/शपथपत्र प्रारूप तयार करणे.<br>३. शासकीय अभियोक्ता यांचेकडे न्यायालयाच्या प्रकरणाचा पाठपुरावा करणे व आवश्यक माहिती देणे.<br>४. न्यायालयीन प्रकरणा संबंधी इतर अनुषंगिक कामे<br>उपरोक्त विधीविषायक कामकाजाकरीता वर्तमानपत्रात जाहिरात देऊन अनुभवी ०४ कायदेशीर सल्लागारांचे पॅनल तयार करणे प्रस्तावित आहे. मंडळाच्या मुख्यालय स्तरावर प्रस्तावित पॅनलच्या नेमणुकीकरीता मंडळाची |



**अध्यक्ष**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | मान्यता प्रस्तावित आहे.<br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: न्यायालयीन प्रकरणे व प्रस्तावित कामे हाताळणेकरीता वर्तमान पत्रात जाहिरात देवून २ कायदेविषयक सल्लागारांचे पॅनल तयार करण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| १६. | **आयत्या वेळचे विषय.** | **विषय क्र.१: नोंदित बांधकाम कामगारांना त्यांच्या सोयीसाठी Kit उपलब्ध करून देणेबाबत.**<br>याबाबत मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी असे सुचित केले की, नोंदित बांधकाम कामगारांना त्यांच्या सोयीसाठी टॉर्च, चटई, प्रथमोपचार पेटी, इ. यासारख्या वस्तू खरेदी करण्यासाठी योजना चालु करण्यात यावी. याबाबत बोलताना मा. कामगार आयुक्त यांनी स्पष्ट केले की, बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तू खरेदीकरीता रु. ३०००/- एवढे अनुदान देणेबाबत यापुर्वीच निर्णय होवून योजना कार्यान्वित आहे सदर योजनांची मुदत तपासून व मा. अध्यक्ष यांनी प्रस्तावित केलेल्या बाबी विचारात घेऊन बांधकाम कामगारांकरीता Kit खरेदीचा सविस्तर प्रस्ताव आगामी मंडळाच्या बैठकीत सादर करण्यात यावा. याविषयी चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: नोंदित बांधकाम कामगारांना यापूर्वी गृहपयोगी वस्तू खरेदीकरीता देण्यात आलेले अनुदान, सदर अनुदानाची मुदत या बाबी तपासून प्रस्तावित बाबींचे Kit खरेदी करण्यास अथवा DBT पद्धतीने अनुदान त्यांचे बँक खात्यात जमा करण्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव आगामी मंडळ बैठकीत चर्चेस घेण्यात यावा असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

सर्व विषयांवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर मंडळ सचिव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानुन बैठक संपल्याचे जाहिर केले.

*****************

**अध्यक्ष**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**